क्रमांकः १३६५०/क-२(संगणक)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन , मुंबई
दिनांक : ०१/१०/२०२०

## :: परिपत्रक ::

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील संगणकीकरण प्रकल्पांतर्गत मा. पिठासीन अधिकारी कार्यालये, अधिकारी व कक्ष यांना संगणक, संगणकीय साहित्य व सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. संगणकीय साहित्याचा वेळेवर पुरवठा करण्याची जबाबदारी संगणक कक्षाकडे आहे. त्यामुळे या सचिवालयात पुरविण्यात येणा-या संगणकीय साहित्य व सुविधांचा प्राथमिक अंदाज संगणक कक्षाकडे असणे आवश्यक आहे, जेणेकरून पुरविण्यात येणा-या साहित्य व सुविधांमध्ये सुसूत्रता आणून या सचिवालयातील कामकाज सुरळीत चालेल. ही बाब लक्षात घेऊन, आगामी कालावधीत कोणत्या कक्षास किती संगणक व संगणकीय साहित्य देण्यात यावे याबाबतचे धोरण निश्चित करून त्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने या सचिवालयातील सर्व संबंधितांकडून त्यांच्या कक्षात उपलब्ध असलेले संगणकीय साहित्य व सुविधा, तसेच त्यांना आवश्यक असल्यास त्यांना लागणारे अधिकचे संगणकीय साहित्य व सुविधा याबाबतची माहिती पर्याप्त कारणमिमांसेसहित सर्व संबंधितांनी खालील विवरणात भरून संगणक कक्षाकडे दिनांक १५/१०/२०२० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत पाठवावी.

| अ. क्र. | कार्यालय/ कक्ष | एकूण कर्मचा-यांची संख्या | वापरातील संगणक | वापरातील प्रिन्टर्स | स्कॅनर | इंटरनेट सुविधा (आहे/नाही) | अधिकची मागणी C-Computer P-Printer |
|---|---|---|---|---|---|---|---|

(शिवदर्शन साठ्ये)
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रत :- १) मा. पिठासीन अधिकारी/ मा. उप पिठासीन अधिकारी/ मा. विरोधी पक्ष नेता (म.वि.प.) / मा. विरोधी पक्ष नेता (म.वि.स.) आणि मा. समिती प्रमुखांच्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी
२) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष